पिंपरी चिंचवड महानगरपालिका
'क'प्रभाग कार्यालय,भोसरी २६
जा.क्र.कप्रस/२/सभा/कावि/१७५/२००९
दिनांकः- १६/५/२००९

प्रति,

....................
सदस्य/सदस्या
'क'प्रभाग समिती

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा क्र.३ बुधवार दिनांक ३/६/२००९ रोजी दुपारी १२.०० वा.आयोजीत केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ३/६/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता 'क' प्रभाग कार्यालयाचे 'श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात' आयोजीत केली असून, सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे,सभेस आपण उपस्थित रहावे,ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
'क'प्रभाग समिती

प्रत.सर्व संबंधित शाखा प्रमुख/शाखाधिकारी,क प्रभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

‘क’प्रभाग समिती

कार्यक्रमपत्रिका क्र.३

सभावृत्तांत

दिनांकः- ३/६/२००९ वेळ.दु.१२.०० वा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘क’प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ३/६/२००९ दुपारी १२.०० वाजता क प्रभाग कार्यालयातील ‘श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात’ आयोजीत करण्यात आली आहे.

विषय क्र.१ मौजे भोसरी येथील पी.सी.एम.टी.चौक ते दुर्गादेवी मंदिर १२.०० मी.रस्ता रुंदीबाबत.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीएस-१८९३-१४९३-युडी-१३,दि.२८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर असून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नियोजन नियंत्रणाखालील क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली दि.१५ नोव्हेंबर १९९७ अन्वये आलेले आहे.

सदर मंजूर विकास योजनेत सदर १२.०० मी.नियोजित रस्तारुंदी काही ठिकाणी स.नं.च्या हद्दीवर व काही ठिकाणी त्यावेळच्या विद्यमान रस्त्याच्या दोन्ही बाजूस दर्शविलेली आहे. तथापि प्रस्तुत रस्त्याचे जागेवर सिमांकनकामी प्लेन टेबल सर्व्हे करण्यात आलेला आहे. सदर सर्व्हेक्षणात मंजूर विकास योजनेत ज्याठिकाणी विद्यमान रस्ता दर्शविलेला नाही त्याठिकाणीही रस्ता अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आलेले आहे,त्यामुळे सदर पूर्ण रस्त्याचा आधार घेवून सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस कमीत कमी मिळकती बाधित होतील या दृष्टीने साधारणपणे समसमान रस्तारुंदीप्रमाणे सिमांकन करण्यात आलेले आहे.प्रस्तुतची रस्तारुंदी ही मंजूर विकास योजनेप्रमाणे नाही.परंतु सदर सिमांकनाप्रमाणे जागेवर काही मिळकती विकसित झालेल्या आहेत तसेच काही मिळकतीतील रस्तारुंदीकरणाने बाधित क्षेत्र चटई निर्देशांकाच्या मोबदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यातही आले आहे. त्यामुळे सदर आखणीनुसार रस्तारुंदी ठेवणे योग्य असल्याने त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम २०५ अंतर्गत म.न.पा.चे रस्ते घोषित करणेकामी मा.क प्रभाग ठराव क्र.१८७७,दि. २३/०७/२००६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.त्यानुषंगाने सदर प्रस्तावाबाबत हरकती सुचना मागविणेकामी ३० दिवसांच्या मुदतीत स्थानिक वृत्तपत्रात दि.११/११/२००६,दै.कात्रज-च्या दै.कात्रजच्या बोगद्यातून दि.२०/११/२००६ व लोकमान्य सांजवार्ता दि.२०/११/२००६ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे.सदर नोटीसीच्या अनुषंगाने कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झालेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम २०५ अंतर्गत सदर रस्ता अंतिमरित्या घोषित करणेसाठी सदरचे विषयपत्र मा.क प्रभाग समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात यावे. तसेच कार्यकारी अभियंता यांचेमार्फत सदर रस्ता आरक्षणातील बांधकामे काढून घेण्यासाठी कलम ५३,५६ अन्वये कार्यवाहीही करण्यात आलेली

आहे.सबब मुंबई प्रांतिक महानगरपालका अधिनियम,१९४९ चे कलम २०५ अंतर्गत अंतिमरित्या घोषित करावयाच्या रस्त्याच्या आखणीनुसार भूसंपादनाची कार्यवाहीस व मंजूर विकास योजनेतील रस्त्याच्या आखणीत त्या आखणीनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेकामी मा.क प्रभाग समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी सदरचे विषयपत्र मा.क प्रभाग समितीपुढे ठेवणेस विचार करणे.

विषय क्र.२ भोसरी सँन्डविक कॉलनीमधील वॉर्ड क्र.१७ मधील भागात बीबीएम व कारपेट पध्दतीने रस्ते दुरुस्ती करणेकामी र.रुपये ५,००,०००/- च्या खर्चास मान्यता देणेकामी विचार करणे.

विषय क्र.३ वॉर्ड क्र.१७ सँन्डविक कॉलनीमध्ये स्थापत्यविषयक कामे करणेकामी र.रुपये ५,००,०००/-च्या खर्चास मान्यता देणेकामी विचार करणे.

विषय क्र.४ प्र.क्र.२४ मध्ये विविध ठिकाणी स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्ती कामे करणेकामी र.रुपये ५,००,०००/-च्या खर्चास मान्यता देणेकामी विचार करणे

विषय क्र.५ वॉर्ड क्र.१७ सँन्डविक कॉलनीमध्ये इंटरलॉकीग ब्लॉक व कॉंक्रीट पेव्हींग विषयक कामे करणेकामी र.रुपये ५,००,०००/- च्या खर्चास मान्यता देणेकामी विचार करणे.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
'क'प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८,क प्रभाग कार्यालय
जा.क्र.कप्रस/२/सभा/कावि/१७६/२००९
दिनांकः- २५/५/२००९